| MHAH050007002022 | नियमित दरखास्त क्र. ६४/२०२२<br>अशोक सहकारी साखर कारखाना वि. जाकीयाबानो फिरोज खान |
|---|---|

## निशाणी ०१ खालील आदेश पारीत

अभिलेखाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, प्रस्तुत दरखास्त लवाद मुकादमा क्र. ५३/२०२१ च्या अंमलबजावणीसाठी दाखल केलेली आहे. सदर मुकादम्यात दिनांक १५/०३/२०२२ रोजीन्यायनिर्णय देण्यात आलेला होता व ऋणकोंना १,२७,४५४/– व त्या मुद्दल रक्कमेवर १५.५० टक्के व्याज दराने दिनांक १२/०१/२०२१ पासुन परतफेड करण्याचे आदेश देण्यात आले होते.

२. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की ऋणको प्रस्तुत कामी हजर झालेले नाही. धनकोने वेळोवेळी जंगम वॉरंट काढण्यासाठी पाउले उचललेली आहेत.

३. आज रोजी धनको तर्फे माहितगार इसम लव शिंदे व विधीज्ञ आर.एन शर्मा हजर. त्यांनी अभिलेखावर निशाणी २१ वर पुरसिस दाखल केली असुन न्यायालयास कळविले आहे की, तडजोड यशस्वी झाली असुन प्रस्तुत प्रकरणातील सर्व रक्कम ऋणको यांनी धनकोला अदा केलेली आहे व आता ऋणकोचे धनको कडे काही थकबाकी नाही. धनकोने प्रस्तुत दरखास्त निकाली काढण्यात यावी अशी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत दरखास्त रक्कम वसुली साठी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ अंतर्गत क्रम २१ नियम ३२ प्रमाणे दाखल करण्यात आली होती. निशाणी २१ वरील पुरसिस अनुसार प्रस्तुत दरखास्तीचे उद्दीष्ट साध्य झाले असल्यामुळे प्रस्तुत दरखास्त निकाली करण्यास कोणतीही अडचण नाही त्यामुळे खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. नियमित दरखास्त क्र.६४/२०२२ चे उद्दीष्ट साध्य झाल्यामुळे प्रस्तुत प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

३. निशाणी १९ वरील अर्ज फाईल्ड करण्यात येत आहे.

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2025.11.26 12:06:48 +0530

(काटकर विजया एन.एस.)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
न्यायालय क्र.४, श्रीरामपूर.

दिनांक–२५.११.२०२५